**सत्र खटला क्र.१३८/२०१५.**

**सरकार वि. प्रेमलाल ऊर्फ प्रेमा यादव व इतर.**

**निशानी क्र. ४५.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०४ यांची जबानी**

**मी याद्वारे शपथेवर सांगतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | अरविंद प्रल्हादराव सराफ. |
| वय | – | ६५ वर्ष |
| व्यवसाय | – | सेवानिवृत्त. |
| पत्ता | – | नरेंद्र नगर, नागपुर. |

**सरतपासणी सहा. सरकारी वकिल श्री. व्ही.डी.हुकरे मार्फत शपथेवर सुरु** –

1. दि.०३.०८.२०१४ रोजी मी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण येथे सहा. पोलिस निरिक्षक म्हणुन काम करीत होतो. पी.आय.भांडारकर यांनी मला अपराध क्र.६१/२०१४ मधील आरोपींना अटक करण्याबददल लेखी आदेश दिले होते. आता मला जो आदेश दाखविला तो तोच आहे. त्यावर पी.आय. भांडारकर यांची सही आहे. तो **निशानी क्र.४६** वर आहे. मी आरोपींचा शोध घेण्याकरीता ४ पथके तयार केली. आणि मी चोरबाहुली पोलिस स्टेशन देवलापार या भागात चारही पथकांसह गेलो. माझा पथकात उमेश ठाकरे एनपीसी, संदिप नागोसे, नागपुरे, सनोडीया आणि नाना राऊत हे शिपाई होते. आमचा वाहनाचा चालक सुटे नावाचा होता. आम्हाला तिथे गेल्यावर खबर मिळाली की दोन्ही आरोपी मुखनापुर जंगलात ते लपलेले आहे. ती माहिती साळुंके, एस.पी. यांना कळविल्यावर त्यांनी त्या चारही पथकांना मुखनापुर जंगलात एकत्रीतरित्या आरोपींच्या शोध घेण्यास आदेशीत केले. मी माझा पथकासह मुखनापुर जंगलात जावुन आरोपींच्या शोध दि.०६.०८.२०१४ रोजी सुरु केला. जंगलामध्ये शोध घेत असतांना आरोपी प्रेमा यादव आणि जयसिंग यादव हे आम्हाला झाडांमध्ये लपलेले दिसले. पोलिसांना पाहताच आरोपी जयसिंग याने पोलिसांकडे पाहुन त्या दिशेने पिस्तुल दाखविले. मी त्याला पिस्तुल खाली ठेवुन पोलिसांच्या हवाली हो असे सांगितले. त्याने पिस्तुल खाली न ठेवल्याने मी संदिप नागोसे याचा

जवळ असलेल्या रिवॉल्वर मधुन दोन राऊंड हवेत फायर केले. ते दोघेही पळायला लागले. आम्ही पाठलाग करुन प्रेमा यादव याला काही अंतरावर पकडले. जयसिंग जंगलात पळुन गेला. प्रेमाला पकडुन त्याला माहिती विचारुन जयसिंग याचा लपण्याचा जागा विचारल्या आणि त्या प्रमाणे जयसिंगचा शोध घेतला. शोध घेता घेता काळोख व्हायला लागला म्हणुन आम्ही प्रेमा यादवला घेवुन परत निघालो आणि पोलिस स्टेशन देवलापार येथे आरोपी प्रेमा यादवसह आलो. पोलिस स्टेशन देवलापार येथे येथे लेखी फिर्याद दिली. आता मला जी फिर्याद दाखविली ती तिच आहे त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला **निशानी क्र.४७** देण्यात आला. माझा फिर्यादीवरुन गुन्हा नोंदविण्यात आला. आता मला छापिल एफआयआर दाखविला त्यावर माझी सही आहे. तो **निशानी क्र.४८** वर आहे.

2. दुस–या दिवशी मी तपासी अधिकारी यांचेसोबत परत जंगलात गेलो तिथे मी घटनास्थळ दाखविले. तिथे घटनास्थळ पंचनामा पंचासमक्ष तयार केला. तपासी अधिकारी यांनी माझे बयान नोंदविले होते. मी दोन्ही आरोपींना ओळखु शकतो. ते कोर्टासमोर हजर आहेत. मी पिस्तुल दुरुन बघीतल्यामुळे ती मी ओळखु शकत नाही.

**उलटतपासणी आरोपींचे वकिल श्री. आर. के. तिवारी मार्फत –**

3. मी ५.३० वाजता जंगलात पोहोचलो. एनएच ७ या रस्त्यापासुन काही अंतरावर सुरु होणा–या पायवाटीजवळ आम्ही गाडी ठेवली. दिड ते दोन किलोमीटर अंतर गेल्यावर आम्हाला आरोपी दिसले. त्यावेळी इतर पथक दुस–या भागात होते. आमचेसोबत वायरलेस सेट नव्हता. मोबाईल जंगलात रेंज नसल्याने चालत नाही. आम्ही जंगलाचा कोअर भागात गेलो होतो. आम्ही फॉरेस्ट विभागाला कळविले नव्हते. फॉरेस्ट विभागाचा कोणीही आमचेसोबत नव्हता. त्या भागामध्ये जंगलात जंगली स्वापद वास करतात. आरोपी माझा नजरेचा टप्यामध्ये असल्याने मला दिसला. मला फुटात किंवा मीटरमध्ये अंतर सांगता येत नाही. आम्ही आरोपींच्या मागे १० ते १५ मिनिट धावलो आणि आरोपी जवळ पोहोचलो. चालत ते अंतर जायला किती वेळ लागला असता ते सांगता येत नाही. आरोपी पश्चीम दिशेने पळाला. दोन्ही आरोपी वेगवेगळया बाजुला पळाले. ज्यावेळी आरोपीने आमचेवर पिस्तुल रोखले त्यावेळी तो

आमचा पासुन ३०–३५ मीटर अंतरावर असेल. पावसाळा असल्यामुळे जंगलात गवत व झुडुप वाढलेले होते. मी आरोपी प्रेमलालला घेवुन त्याचा घरी गेलो नव्हतो. मी दिपक साळुंके, एस.पी. यांना प्रेमलालला पकडल्याचे सांगितले त्यांनी इतर पथकांना माहिती दिली आणि पोलिस स्टेशनला बोलविले. मी इतर पथकांना जयसिंग कोणत्या दिशेने पळाला हे सांगितले नव्हते. मी आरोपी जयसिंग याचा पाऊन तास प्रेमलालला पकडल्यानंतर शोध घेतला. त्यावेळी माझा पथकातील सर्व लोक सोबत होते. असे घडले नाही की, गोळी झाडली त्याठिकाणचा पंचनामा त्याचवेळी केला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी प्रेमलाल याला त्याचा घरुन पकडण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, मी जंगलात गेलो नव्हतो आणि आरोपींना जंगलात पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, जयसिंग याने आमचेवर अग्नीशस्त्र रोखले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींविरुद्ध बनावट कहानी तयार केली आणि खोटी साक्ष देत आहे.

<u>**फेरतपासणी नाही.**</u>

श्रवणोत्तर स्विकृत,

नागपूर (एम.एस.गणोरकर)
दि.०८.०५.२०२६. अति. सत्र न्यायाधिश – ६,
नागपूर.